# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ

नांदेड– ४३१६०६ (महाराष्ट्र)

## SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY

NANDED-431606, MAHARASHTRA STATE, INDIA.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड.

Established on 17th September 1994 - Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade

## Director, Board of Examination & Evaluation

Phone: (02462) 229294
Fax : (02462) 229520

Website: www.srtmun.ac.in

E-mail: srtmuncoe@gmail.com


संदर्भ : परीक्षा / समन्वय / 2018–2019 / 1325

दिनांकः 04.10.2018

परीक्षा प्राधान्य / महत्वाचे

प्रति,
**मा.प्राचार्य तथा केंद्र प्रमुख,**
हिवाळी–2018 सर्व परीक्षा केंद्र,
प्रस्तुत विद्यापीठ.

**विषयः हिवाळी 2018 परीक्षासाठी उत्तर पुस्तिकांच्या वापराबाबत व इतर सुचना.**

महोदय,

उपरोक्त विषयी आपणास कळविण्यात येते की, प्रस्तुत विद्यापीठाच्या हिवाळी–2018 पदवी अभ्यासक्रमाच्या परीक्षा दि. 06.10.2018 पासून तर पद्व्यूत्तर परीक्षा दि. 26.11.2018 पासुन सुरु होत असून त्यासाठी आवश्यक असलेल्या 20+OMR Sheet सह उत्तरपुस्तिका, 20 पानी उत्तरपुस्तिका, 24 पानी उत्तरपुस्तिका आणि 32 पानी उत्तरपुस्तिका अशा एकूण चार प्रकारच्या उत्तरपुस्तिका पुरवठा करण्यात आलेला आहेत. या उत्तरपुस्तिका दिनांक 08.02.2017 रोजी संपन्न झालेल्या परीक्षा व मुल्यमापन मंडळाच्या बैठकीतील ठरावानुसार खालील प्रमाणे वापर कराव्यात.

1. 20+OMR Sheet सह असलेली उत्तरपुस्तिका बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी व बी.बी.ए. हया अभ्यासक्रमाच्या Theory+MCQ Pattern च्या प्रथम व द्वितीय वर्षासाठी वापरण्यात याव्यात.

   एमसीक्यु प्रश्नांसाठी केवळ सुरूवातीचा अर्धा तास देण्यात आलेला असून तो अर्धा तास संपल्यानंतर ओएमआर सीट संबधीत पर्यवेक्षकांनी जमा करून घ्यावी व ती लगेच एका वेगळया पाकीटात सिलबंद करावे व परीक्षा संपल्यानंतर केंद्रप्रमुखानी उपस्थिती अहवालाची एक छायांकीत प्रत काढून या ओएमआर सीट व उपस्थिती अहवालासह सिलबंद करून केंद्रीय मुल्यांकन केंद्र प्रस्तुत विद्यापीठात पाठविण्यात यावेत.
2. 24 पानी बारकोड उत्तरपुस्तिकांचा वापर बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी. व बी.बी.ए. या अभ्यासक्रामाच्या थेअरी + एम.सी.क्यू.या पॅटर्नच्या तृतीय वर्षासाठी वापरावीत.
3. ज्या अभ्यासक्रमाच्या प्रश्नपत्रिका 50 गुण व त्यापेक्षा अधिक असतील तर या अभ्यासक्रमाच्या पदवी / पद्व्युत्तर परीक्षेसाठी 32 पानी बारकोड असलेल्या उत्तरपुस्तिकांचा वापर करण्यात यावा.
4. **केवळ हिवाळी–2018 परीक्षांसाठी नांदेड जिल्हयातील परीक्षा केंद्रांना** 20 पानी उत्तरपुस्तिका व OMR Sheet हया वेगवेगळया पुरविण्यात येत असून त्याचा वापर बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी. आणि बी.बी.ए. (Theory + MCQ Pattern) प्रथम व द्वितीय वर्षासाठीच करण्यात यावे.
5. हिवाळी–2018 परीक्षेसाठी पूर्वीच्या शिल्लक असलेल्या (बी.कॉम. प्रथम व द्वितीय वर्षासाठी विद्यार्थ्यांच्या सीट नंबरचा स्टिकर लावण्यासाठी कोरी जागा असलेल्या) **उत्तर पुस्तिका वापरू नयेत** व शिल्लक उत्तर पुस्तिका परीक्षा विभागात विद्यापीठ वाहनासोबत पाठवावेत.

6. परीक्षार्थीना उत्तरपुस्तिका वितरीत करण्यापूर्वी त्यावर बारकोड, अनुक्रमांक असल्याचा तसेच उत्तरपुस्तीकेतील सर्व पाने सुस्थीतीत असल्याची खात्री पर्यवेक्षकांनी/विद्यार्थ्यांनी करावी उत्तरपुस्तिकेतील पाने कमी असल्याचे आढळून आल्यास ती उत्तरपुस्तिका वापरू नयेत.

7. कुठल्याही परिस्थितीत परीक्षार्थीना पुरवणी देण्यात येवू नये. तसेच पुरवणी देण्याबाबत परीक्षा विभागास संपर्क करू नये.

8. परीक्षा केंद्रास आवश्यक असणाऱ्या उत्तरपुस्तिका व इतर स्टेशनरीची मागणी किमान तीन दिवस अगोदर उपकुलसचिव, परीक्षा विभाग यांचेकडे भ्रमणध्वनी क्रमांक 9923409491, 7776995388 वर संपर्क करावा.

9. परीक्षार्थीनी उत्तरपुस्तिकेवर त्यांना प्रवेशपत्रावर दिलेला बैठक क्रमांक विषयाचे नाव अचूक लिहीला असल्याची खात्री पर्यवेक्षकांनी करावी. जेणे करून निकाल प्रलंबित राहणार नाहीत.

10. दीव्यांग विद्यार्थ्यांना द्यावयाच्या सोई/सुविधा संदर्भात उच्च व तंत्रशिक्षण विभाग मंत्रालय, मुंबई यांचे दिनांक 04 मार्च 2017 या शासन निर्णयानुसार कार्यवाही करावी. हा शासन निर्णय विद्यापीठ संकेतस्थळावर देण्यात आलेला आहे.

11. दीव्यांग विद्यार्थ्यासाठी देण्यात येणाऱ्या उत्तरपुस्तिकेवर **दीव्यांग विद्यार्थी** असा रबरी शिक्का तयार करून घेवून तो शिक्का उत्तरपुस्तिकेवर मारण्यात यावे किंवा या उत्तरपुस्तिका स्वतंत्रपणे मुल्यांकन केंद्रास पठविण्यात यावेत. तसेच दीव्यांग विद्यार्थ्यांचे महाविद्यालय स्तरावर मुल्यांकन करताना उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन निर्णय दिनांक 04.03.2017 नुसार कार्यवाही करावी. (हा शासन निर्णय विद्यापीठ संकेत स्थळावर उपलब्ध आहे).

12. दीव्यांग विद्यार्थ्यासाठी परीक्षा दालन तळमजल्यावर देण्यात यावे. तसेच शासन निर्णयातील तरतुदीनुसार सोई सुविधा व लेखणीक वापरण्याची अनुमती द्यावी व अधीकचा वेळ देण्यात यावा. संपूर्ण सूचना विद्यापीठ संकेतस्थळावर देण्यात आलेल्या आहेत.

13. बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी. प्रथम, व्दितीय व तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांची अनुपस्थिती अहवाल व MP cases ऑनलाईन दिलेल्या लिंकवर सादर करावयाची आहे.

14. परीक्षेतील गैरवर्तणूक /नकलांचे प्रकरणे तीन दिवसाच्या आत परीक्षा विभागात खास दुता मार्फत जमा करावेत.

15. परीक्षे दरम्याण गैर प्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या उत्तर पुस्तिकेवर व नक्कल समग्री (Copy Material) सह त्या विद्यार्थ्यांची स्वाक्षरी घेण्यात यावी जर विद्यार्थ्याने स्वाक्षरी करण्यास नकार दिल्यास परीक्षा हॉल मधील इतर विद्यार्थ्यांची पुरावा म्हणुन स्वाक्षरी घेण्यात यावी.

संचालक

परीक्षा व मुल्यमापन मंडळ